**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०७ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **'वंदे मातरम्' या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन, राज्यात सर्वत्र सामूहिक वंदे मातरम गायनाचा उत्साह.**
2. **२० नोव्हेम्बर पासून गोव्यात होणारा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - इफ्फी-२०२५ हा भारतीय निर्मात्यांना जगाशी जोडणारा सेतू ठरणार असल्याचं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांचं प्रतिपादन.**
3. **स्वामी गोविंददेव गिरी महाराज आणि डॉ. चंद्रप्रकाश द्विवेदी यांच्या विशेष उपस्थितीत आज होणार खासदार सांस्कृतिक महोत्सवाचं उद्घाटन.**
4. **विश्वविजेत्या महिला क्रिकेट संघातील स्मृती मांधना, जेमिमा रॉड्रिग्ज, राधा यादव यांना राज्य शासनातर्फे प्रत्येकी सव्वा दोन कोटीं रुपयांचा धनादेश.**

**आणि**

5. **विदर्भात हिवाळ्याची चाहूल; बहुतांश जिल्हयात किमान तापमानात घट.**

**आता सविस्तर बातम्या .......**

**'वंदे मातरम'-पंतप्रधान नरेंद्र मोदी**

'वंदे मातरम' हा एक मंत्र, एक ऊर्जा, एक स्वप्न आणि एक संकल्प असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम' ला दीडशे वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आजपासून देशभरात सुरु झालेल्या स्मरणोत्सवाचं उद्घाटन आज नवी दिल्लीत पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. गुलामीच्या त्या काळात 'वंदे मातरम' हे केवळ एक गीत नव्हतं, तर तो एक संकल्पाचा, भारताच्या स्वातंत्र्याचा, आणि भारतमातेची मुलं स्वतःचं नशीब स्वतः बनवतील, असा उद्घोष होता, असं त्यांनी नमूद केलं. या गीताचा भावार्थ विषद करताना पंतप्रधान म्हणाले,

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी ३५ सेकंद)***

***'वंदे मातरम्' का मूल भाव है, भारत माँ भारती, भारत की शाश्वत संकल्पना वो संकल्पना जिसने मानवता के प्रथम पहर से खुद को घटना शुरू कर दिया जिसने युगों युगों को एक एक अध्याय के रूप में पड़ा शून्य से शिखर तक उनकी यात्रा और शिखर से पुन: शून्य में उनका विलय भारत ने ये सब कुछ देखा है।***

'वंदे मातरम' या गीताला दीडशे वर्षं पूर्ण झाल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या गीताचं स्मरण केलं आहे. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या प्रतिभेतून साकारलेलं हे गीत भारतीयांना एका सूत्रात बांधून ठेवत आलं आहे आणि यापुढेही ठेवेल, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**'वंदे मातरम'-विदर्भ**

'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताचा शतकोत्तर सुवर्ण मोहत्सव आज सर्वत्र साजरा करण्यात येत आहे. ऐकुया त्यावर आधारित हा रिपोर्ट-

*(व्हॉइस कास्ट - नेहा क्षीरसागर)*

*जात, पंथ, धर्म, भाषा यांचे सर्व भेद विसरून स्वातंत्र्यलढ्यात सर्वांनी 'वंदे मातरम्' चा जयघोष केला होता. वंदे मातरम् हा स्वातंत्र्यलढ्याचा परवलीचा शब्द होता आणि क्रांतिकारकांचे घोषवाक्यही याच गीतातून तयार झाले. विश्वाला मार्गदर्शन करणारा भारत घडवण्यासाठी राष्ट्रभक्ती आणि एकात्मता आवश्यक आहे. यासाठी 'वंदे मातरम्'च्या सामुहिक गायनाने संकल्प करूया, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. आज मंत्रालयात 'वंदे मातरम्' गीताला दिडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित सामूहिक 'वंदे मातरम्' गायनाचा कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात 'वंदे मातरम्' गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त सामूहिक गायन झालं. अमरावतीच्या संत गाडगे बाबा विद्यापीठ देखील मुख्य प्रशासकीय इमारतीजवळ कुलगुरूंच्या उपस्थितीत सामूहिक गायनाचं आयोजन करण्यात आलं. त्याच प्रमाणे विभागीय आयुक्त कार्यालयात राष्ट्रभक्तीच्या वातावरणात 'वंदे मातरम्' गीताचं आज सामूहिक गायन करण्यात आलं .वाशीम जिल्हा क्रीडा संकुलावर हजारो विद्यार्थ्यांनी एकत्र येत 'वंदे मातरम्'च सामूहिक गायन केलं. विद्यार्थ्यांनी लघुनाटिका आणि नृत्य सादर करून गीताच महत्व अधोरेखित केलं. देशभक्तीची प्रेरणा देणाऱ्या "वंदे मातरम्" या अमर गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त आज गोंदियात सामूहिक गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अकोल्यात देखील लाल बहादूर शास्त्री क्रीडांगणावर हजारो विद्यार्थी आणि तरुणांच्या उपस्थितीत सामूहिक गायनाचा सोहळा पारपडला.तर भंडाऱ्यातील लाखनीइथं ४७३२ विद्यार्थ्यांनी एकत्र येत 'वंदे मातरम्'चे सुमधुर गायन करून वातावरणात चैतन्य भरलं. यवतमाळच्या उमरखेड येथील जिल्हा परिषद प्रांगणात देखील आज सर्व शाळांनी मिळूनसमूहगान करत या गीताचं महत्व समजून घेतलं. (आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी नेहा क्षीरसागर)*

**इफफी**

गोव्यात होणारा इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२५ हा भारतीय निर्मात्यांना जगाशी जोडणारा सेतु ठरेल असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांनी केलं. यंदाच्या महोत्सवात ८१ देशांतील २४० चित्रपट प्रदर्शित होणार असून, भारतीय चित्रपटांना जागतिक व्यासपीठ मिळेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यंदा एआय आणि एआय-आधारित कंटेंटसाठी विशेष विभागाचाही समावेश करण्यात आला आहे. महिला दिग्दर्शित ५० हून अधिक चित्रपटांच प्रदर्शन होणार असल्यान 'नारी शक्ती'ला बळ मिळेल, अस त्यांनी सांगितल.

*(होल्ड बाईट - डॉ.एल.मुरुगन १४ सेकंद)*

*Hon'ble Prime Minister Shri Narendra Modi is vision Nari Shakti, so the this year almost 50 women film director this 50 films is going to screen and we want to give an equal opportunity.*

दरम्यान, इफ्फी हा देशातील चित्रपट विविधतेचा उत्सव असून जागतिक चित्रपट निर्मात्यांसाठी भारतातील संधींचे व्यासपीठ ठरेल, अस माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू म्हणाले. २० नोव्हेंबर पासून हा महोत्सव सुरु होणार आहे.

**पार्थ पवार**

पुण्यातल्या कोरेगाव पार्क इथल्या कथित जमीन गैरव्यवहार प्रकरणी तहसीलदार आणि दुय्यम निबंधकांना निलंबित केलं असून, अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली आहे. या प्रकरणाच्या चौकशीचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत. या जमीन व्यवहार प्रकरणी पार्थ पवार यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत. या व्यवहाराची महसूल आणि भूमिअभिलेख विभागाकडून संपूर्ण माहिती मागवली असून, अनियमितता असेल तर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**विजय वडेट्टीवार**

दरम्यान पुण्यातल्या कोरेगाव पार्क इथल्या कथित जमीन गैरव्यवहार प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते आज नागपूरमध्ये पत्रकारांशी बोलत होते. या प्रकरणी उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली जावी, अशी मागणीही वडेट्टीवार यांनी केली.

***यामध्ये पार्थ पवार हे पार्टनर आहेत त्यांच्यावर गुन्हा दाखल होण्याची अपेक्षा होती हा एवढा मोठा घोटाळा झाला आहे आणि सरकारने तातडीने ती जमीन मूळ मालकाच्या नावाने करावी.***

**‘खासदार सांस्कृतिक महोत्सव**

बहुप्रतिक्षित खासदार सांस्कृतिक महोत्सव-2025 चं उद्घाटन आज हनुमाननगरातील क्रीडा चौक इथल्या ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणावर होत आहे. सायंकाळी 6.30 वाजता होणा-या या कार्यक्रमात आध्यात्मिक गुरू आणि श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या हस्ते महोत्सवाचं उद्घाटन होईल.कार्यकमाला केंद्रीय मंत्री आणि खासदार सांस्कृतिक महोत्सवाचे प्रणेते नितीन गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह लेखक आणि दिग्दर्शक पद्मश्री डॉ.चंद्रप्रकाश द्विवेदी यांची देखील उपस्थिती राहील. उद्घाटन कार्यक्रमानंतर प्रसिद्ध अभिनेते आशुतोष राणा यांची प्रमुख भूमिका असलेले नाटक ‘हमारे राम’ याची प्रस्तुती होणार आहे. सकाळ आणि संध्याकाळ अशा दोन सत्रात होणा-या या महोत्सवात धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची भरगच्च मेजवानी राहणार असून पुढचे बारा दिवस आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या कलाकारांसोबतच स्थानिक कलाकारांचं देखील सादरीकरण होणार आहे.

**सेलिब्रेटिंग गुरू दत्त’**

महान दिग्दर्शक गुरू दत्त यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ‘सेलिब्रेटिंग गुरू दत्त’ हा दोन दिवसीय महोत्सव १५ आणि १६ नोव्हेंबर रोजी वनामती हॉल, नागपूर इथं पार पडणार आहे. पिफ: नागपूर एडिशन आणि मेराकी परफॉर्मिंग आर्टस् ऑर्गनायझेशनच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या महोत्सवात गुरू दत्त यांच्या चित्रपटांचा आशय, कलात्मकता आणि दिग्दर्शन शैलीवर विविध कार्यक्रम होणार आहेत. अजेय गंपावार यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमात संगीत, चित्रप्रदर्शन, चर्चा आणि माहितीपट यांचा समावेश आहे. समर नखाते, जहांगीर चौधरी, हबीब खान यांसारख्या तज्ज्ञांचं मार्गदर्शन या महोत्सवात लाभणार आहे.

**भटकी कुत्री**

सर्व शैक्षणिक संस्था, रुग्णालयं, सार्वजनिक क्रीडा संकुलं, बसस्थानकं, रेल्वेस्थानकं इत्यादी ठिकाणी भटकी कुत्री येऊ नयेत, यासाठी व्यवस्थित कुंपण घालण्यात यावं, असे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. या सर्व ठिकाणांवरून भटकी कुत्री हटवण्याची आणि त्यांचं लसीकरण

आणि निर्बीजीकरण करून त्यांना आश्रय केंद्रांमध्ये हलवण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची असल्याचंही न्यायालयानं सांगितलं. या ठिकाणांवरून उचललेली भटकी कुत्री पुन्हा त्याच ठिकाणी सोडण्यात येऊ नयेत, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं.

**महिला क्रिकेटर सत्कार**

भारताच्या महिला क्रिकेट संघाने ICC Women's Cricket World Cup 2025 मध्ये ऐतिहासिक विजय मिळवून प्रथमच विजेतेपद पटकावलं. या विजयाच्या निमित्तानं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्मृती मांधना, जेमिमा रॉड्रिग्ज, राधा यादव यांचा वर्षा निवासस्थानी सत्कार करण्यात आला. यावेळी खेळाडूंना प्रत्येकी सव्वा दोन कोटींचा धनादेश, शाल आणि पुष्पगुच्छ देण्यात आले. प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांना साडे बावीस लाखांचा धनादेश देण्यात आला, तर सपोर्ट स्टाफला ११ लाख रुपयांचा सन्मान जाहीर करण्यात आला. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे, आणि मंत्री आशिष शेलार उपस्थित होते. महिला क्रिकेट संघाचा वर्ल्ड कप नेहमी ठराविक देशांकडे जायचा, पण पहिल्यांदाच भारताने विजेतेपद मिळवून जगाचं लक्ष वेधलं आहे, ही अभिमानाची बाब आहे असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**सर्वोच्च न्यायालय**

पोलीस आणि तपास यंत्रणांनी अटक करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला अटकेची कारणं लेखी स्वरूपात लवकरात लवकर देणं बंधनकारक आहे, असा निकाल सर्वोच्च न्यायालयानं काल दिला. संबंधित व्यक्तीचा गुन्हा किंवा त्याच्या अटकेचे नियम किंवा कायदे कोणतेही असले, तरी अटक का केली, हे जाणून घेणं हा त्या व्यक्तीचा मूलभूत अधिकार असल्याचा निर्वाळा सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ए. जी. मसीह यांच्या खंडपीठानं दिला. काही अपवादात्मक परिस्थितीत जर ही कारणं लेखी देणं शक्य नसेल, तर ती तोंडी सांगितली जावीत, त्यानंतरही योग्य कालमर्यादेच्या आत लेखी स्वरूपात कारणं दिली जावीत, असंही पीठानं सांगितलं.

**हवामान**

विदर्भात अनेक जिल्ह्यांमध्ये किमान तापमानात घट होत असल्यानं हिवाळ्याची चाहूल लागली आहे. आज अमरावती जिल्ह्यात किमान तापमान १३ अंश सेल्सियस इतकं नोंदवण्यात आलं. त्या पाठोपाठ यवतमाळ येथे 14 अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान आहे. नागपूरसह अन्य जिल्ह्यात देखील पंधरा ते सोळा अंश सेल्सिअस दरम्यान आहे. आगामी 13 नोव्हेंबर पर्यंत किमान तापमानात किंचित घट होण्याची शक्यता असून ते 15 ते 13 अंश सेल्सिअस दरम्यान राहू शकतं असा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

*****